# सातारा जिल्हा परिषद,सातारा

## ग्रामपंचायत विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२)२३८१२६ फॅक्स नं.२३०६०१ E-mail -: dyceogadstr@gmail.com

**अत्यंत महत्वाचे** जा.क्र.साप्रवि/२/आस्था-२(१)(२)/बदल्या/ /१८

दिनांक -: ०८ : ०५ : २०१८

---

प्रति,

प्रकल्प संचालक जिग्राविय‍ं -
जिल्हा परिषद सातारा
गट विकास अधिकारी,
**पंचायत समिती** ---------------------(सर्व)

विषय -: विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक बदल्यांची अंति वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी सन २०१८ प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ -:१.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५/५/२०१४
२.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दिनांक ०२/०१/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार या विभागाकडील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं/आयआरडीपी) या संवर्गाच्या तात्पुरत्या वास्तव्य सेवा जेष्ठता याद्या दिनांक २७/०४/२०१८ रोजी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदरच्या यादींवर गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम यादी तयार करण्यात आलेली आहे.

**सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.** तरी वरील संवर्गाच्या अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, सर्व संबंधिताच्या स्वाक्षरी घेण्यात येवून दप्तरी ठेवण्यात याव्यात.

जिल्हास्तरीय सर्वसाधारण बदली समुपदेशनासाठी **दिनांक ११/०५/२०१८ रोजी दुपारी ठिक १२.०० वा.** ची वेळ ग्रामपंचायत विभागास निश्चित करुन मिळाली आहे. सबब संबंधित सर्व ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना **सातारा जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात दि. ११/०५/२०१८ रोजी ठिक ११.०० वा.** उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरुन अवगत करण्यात यावे.

तसेच **पक्षाघाताने अजारी कर्मचारी, अपंग कर्मचारी / मतीमंद मुलांचे पालक व परितक्त्या/ घटस्फोटित महिला कर्मचारी यांनी पुराव्याची मूळ (Original) कागदपत्रे घेवून बदली समुपदेशनाच्यावेळी उपस्थित राहण्याचे आहे.** याबाबत सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**

**प्रत :- सातारा जिल्हा परिषद, नोटीस बोर्ड प्रसिध्दीकरीता..**